# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६**
ई-मेल: **mercindia@mercindia.org.in** वेब-साईट www.mercindia.org.in

## जाहीर सूचना

**प्रकरण क्र. २००८/९६** **दिनांक १८ नोव्हेंबर, २००८**

## विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ च्या उप-कलम (५) च्या खंड (अ) खालील सूचना

१. जयगड पॉवर ट्रॅन्स्को लि., “ दि एन्क्लेव्ह ”, मराठे उद्योग भवनाच्या मागे, नवीन प्रभादेवी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५, यांनी पारेषण परवाना मंजूरीसाठी अर्ज केला आहे.

२ जयगड पॉवर ट्रॅन्स्को लि. यांनी आयोगाकडे केलेल्या अर्जाची प्रत, त्यासोबतच्या परिशिष्टे व जोडपत्रांसह आयोगाच्या www.mercindia.org.in या वेब-साईटवर पाहता येईल किंवा कोणत्याही व्यक्तीला अगोदर निश्चित करण्यात आलेल्या पध्दतीनुसार आयोगाच्या कार्यालयात या अर्जाची तपासणी करता येईल.

३. उपलब्ध असलेली माहिती विचारात घेऊन, महाराष्ट्रातील राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा एक भाग म्हणून, जयगड ते कराड आणि जयगड ते नवीन कोयना दरम्यान ४०० केव्ही पारेषण वहन यंत्रणा विकसित करण्यासाठी व संचालन करण्यासाठी पारेषण परवाना मंजूर करण्याकरिता अर्जदार, जयगड पॉवर ट्रॅन्स्को लि., सकृत्दर्शनी अर्हता-प्राप्त असल्याबाबत आयोगाचे समाधान झाले असून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) सुधारित विनियम, २००६ प्रमाणे अर्जदारास पारेषण परवानाधारक म्हणून सदर परवाना मंजूर करण्याचे आयोग प्रस्तावित करीत आहे.

४. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ च्या उप-कलम (५) च्या खंड (अ) नुसार, अर्जदारास आयोगाने पारेषण परवाना मंजूर करण्याच्या प्रस्तावाच्या संदर्भात सूचना व हरकती, असल्यास, त्या खाली स्वाक्षरी करणा-यास **उशिरात उशिरा २ डिसेंबर, २००८** पर्यंत मिळतील अशा रितीने वरील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. वरील तारखेनंतर प्राप्त झालेल्या सूचना व हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५. याबाबत, **बुधवार, दिनांक १७ डिसेंबर, २००८ रोजी सकाळी ११.०० वाजता,** १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई, ४०० ००५, येथे आयोगाच्या कार्यालयात जाहीर सुनावणी घेण्यात येईल.

(प्रफुल्ल एस. व-हाडे)
सचिव, मविनिआ

दिनांकः १८ नोव्हेंबर , २००८
ठिकाणः मुंबई